शालेय शिक्षण व क्रीडा विभागात ईगव्हर्नन्स प्रकल्पाअंतर्गत E & Y सल्लागार सेवा शुल्क अदा करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः ईगव्ह-१५१८/प्र.क्र.३५ /संगणक
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
विस्तार इमारत, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२
दिनांक:- २५ फेब्रुवारी, २०१९

वाचा :-

१) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.मातसं-०८०/४/२०१/-०/० माहिती व तंत्रज्ञान संचालनालय- DIT (MH), दि.०१ जूलै, २०१४
२) शासन निर्णय क्रमांकः संकिर्ण-१५१८/प्र.क्र.५२/संगणक, दि. ७ डिसेंबर, २०१८
३) शासन निर्णय क्रमांकः संकिर्ण-१५१८/प्र.क्र.३५/संगणक, दि. २१ डिसेंबर, २०१८
४) आयुक्त, (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.आशि/२०१९/११९८/विसअताप्रक १०६७९३/ आस्था क १४३/९८७, दि.७.०२.२०१९.

प्रस्तावना :-

संदर्भ क्र.१ च्या अनुषंगाने शालेय शिक्षण विभागात कार्यरत असलेल्या E & Y च्या सर्व सल्लागारांना संदर्भ क्र.२ अन्वये जून, २०१९ अखेरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी E & Y सल्लागारांचे १ ऑगस्ट, २०१८ ते ३१ डिसेंबर, २०१८ च्या सल्लागार शुल्कापोटी रुपये ६०,३०,३९०/- निधीची मागणी संदर्भ क्र.४ अन्वये केली आहे. त्या अनुषंगाने विभागात कार्यरत E & Y सल्लागारांच्या देय शुल्कापोटी निधी वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

१. आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी प्रस्तावित केल्यानुसार E & Y सल्लागारांच्या सेवा शुल्कापोटी रु.६०,३०,३९०/- निधी वितरित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. E & Y सल्लागारांचे सेवा शुल्क संदर्भ क्र.१ वरील शासन निर्णयान्वये विहित केल्यानुसार तसेच कार्यादेशात नमूद अटी व शर्तीनुसार अदा करण्यात येत आहे.

3. २ वरिष्ठ सल्लागारांचे पाच महिन्याचे सेवा शुल्क व ३ वरिष्ठ सल्लागार व १ अर्धवेळ व्यवस्थापकीय सल्लागार यांचे तीन महिन्याचे सेवा शुल्क अशा एकूण देयकाचा तपशिल खालील तक्त्याप्रमाणे आहे.

अ.क्र.	पदनाम	पद संख्या	प्रतिमाह सेवा शुल्क दर	कालावधी	रक्कम
१.	Half Time Managing Consultant	१	१,३९,५००	१ ऑक्टोबर, २०१८ ते ३१ डिसेंबर, २०१८	४,१८,५००
२.	Senior Consultant	२	२,५२,०००	१ ऑक्टोबर, २०१८ ते ३१ डिसेंबर, २०१८	१५,१२,०००
३.	Senior Consultant	१	२,२०,०००	१ ऑक्टोबर, २०१८ ते ३१ डिसेंबर, २०१८	६,६०,०००
४.	Senior Consultant	२	२,५२,०००	१ ऑगस्ट, २०१८ ते ३१ डिसेंबर, २०१८	२५,२०,०००
				एकूण	**५१,१०,५००**
				CGST 9%	**४,५९,९४५**
				SGST 9%	**४,५९,९४५**
				एकूण	**६०,३०,३९०**

४. सदरचा खर्च मागणी क्रमांक. ई-२, २२०२ सर्वसाधारण शिक्षण,८० पंचवार्षिक योजनांतर्गत योजना (०२) (५१) ई-गव्हर्नन्स कार्यक्रम (२२०२ H ४५४) ३१ सहायक अनुदाने या लेखाशिर्षातून सन २०१८-१९ च्या उपलब्ध तरतुदीमधुन भागविण्यात यावा. यासाठी आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना नियंत्रक व सहायक संचालक, (लेखा) माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय, यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०२२५१६०८०५९६२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pravin Rajaram Mundhe

Digitally signed by Pravin Rajaram Mundhe
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8cc298cb2ba38f035e6bd1a51789c7ed1ed4f4fce865ed a3495969f77d97c89a, cn=Pravin Rajaram Mundhe
Date: 2019.02.25 16:10:07 +05'30'

(प्रविण मुंढे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१) मा.अ.मु.स. वित्त विभाग, यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
२) मा.अ.मु.स. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
३) मा.प्र.स.माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई
४) आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे

५) आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे

६) महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर १/२.,

७) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर १/२.

८) जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे

९) निवडनस्ती/संगणक कार्यासन.